वादीतर्फे साक्षीदार क्र.१

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते १० तर्फे वकील श्री. यु.एस. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. गट क्र.७७ मधील जमीन माझे पती शिवाजी यांनी कोणाकडून खरेदी केली हे मला आठवत नाही. सदर जमीन खरेदीची तारीख व वर्ष मी सांगू शकत नाही. सदर जमीन वीस लाख रुपयास खरेदी केली होती. सदर जमिनीची खरेदीखत मी दाखल केले नाही, ते मी दाखल करु शकते. माझे मयत दिर नामदेवच्या नावावर असलेली जमीन त्याचे वडीलाकडून वारसाआधारे आलेली आहे. मुबारकपूर येथील सर्वे क्र.१४/ड मधील जमीन रुक्मीणबाईच्या नावे आहे. सदर जमीन रुक्मीणबाईच्या नावे खरेदीखताआधारे आलेली आहे.

२. केळगाव येथील सर्वे क्र.८८ मधील ६०.७० आर जमीन माझे दिर नामदेव यांच्या नावे होती व सदर जमीन विक्री झालेली आहे. माझ्या अतिरिक्त सरतपासातील परिच्छेद क्र.५/१ मध्ये नमूद खरेदीखत २०२१ साली रु.१९,००,०००/- ला झालेली आहे. सदर खरेदीखत मी दाखल केले आहे. सदर खरेदीखत विनामोबदला झालेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.६ ते १० यांनी त्यांच्या कौटुंबिक गरजेपोटी जमीन विक्री केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमिनीशी माझा काहीही संबंध नसताना प्रतिवादी क्र.६ ते १० यांच्या व्यवहाराला हस्तक्षेप करण्यासाठी मी अतिरिक्त पुरावा दिलेला आहे. प्रतिवादी क्र.६ ते १० यांच्या नावाने ७/१२ वर आलेल्या नोदींविरोधात मी आजतागायत अपील केलेले आहे. त्याचा निकाल माझ्या बाजुने लागलेला आहे. त्याची नक्कल मी दाखल करु शकते. हे म्हणणे खरे आहे की, २०२१ च्या खरेदीखताआधारे ७/१२ उताऱ्यावर प्रतिवादी क्र.१२ व १३ यांच्या नावे नोंद झालेली आहे.

**प्रतिवादी क्र.१२ व १३ यांचे विधीज्ञांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2025.03.27 11:44:29 +0530

दि.२६/०३/२०२५

**(श्रीमती. व्ही. डी. भोसले)**
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.